# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

---

जा.क्र.राआ/महा./ कोरोना/अत्या. काम. /२०२०/१४३६ दिनांकः- १०.०५.२०२०

## -: परिपत्रक :-

याद्वारे सर्व ॲडव्होकेट व पक्षकारांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्रातील राज्य आयोगाची परिक्रमा खंडपीठे व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचासमोर प्रलंबित असणा-या व दोन्ही पक्षकारांतर्फे लेखी युक्तीवाद दाखल झालेल्या प्रकरणामध्ये, उभय पक्षकारांनी अथवा त्यांच्या तर्फे वकीलांनी सदरचे प्रकरण दाखल असणा-या लेखी युक्तीवादावरच अंतिमतः निकाली करावे अशी संयुक्त पुर्सीस दिल्यास परिक्रमा खंडपीठामार्फत किंवा जिल्हा मंचामार्फत सदर प्रकरणामध्ये अंतिम निर्णय पारित करण्यात येईल. तशी पुर्सीस प्रकरणातील वकीलांनी अथवा पक्षकारांनी संबधित राज्य आयोग परिक्रमा खंडपीठ किंवा जिल्हा मंच कार्यालयात द्यावी अथवा ईमेलद्वारे पाठवावी. ज्या प्रकरणामध्ये वरील प्रमाणे पुर्सीस दाखल झालेली आहे ती प्रकरणे कार्यालयाने राज्य आयोगाच्या बाबतीत मा. सदस्यांना व जिल्हा मंचाच्या बाबतीत मा. अध्यक्षांकडे व मा. सदस्यांकडे आणुन द्यावीत. ज्या पक्षकारांना तसेच वकीलांना वर नमुद केल्याप्रमाणे संयुक्त पुर्सीस देण्याची आहे त्यांनी परिक्रमा खंडपीठांतील व जिल्हा मंच कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा.

सदरचे निर्देश राज्यामध्ये असणारा लॉकडाऊन चालू असेपर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

Sd/-
( न्या. अशोक पि. भंगाळे )
अध्यक्ष,
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र मुंबई.

प्रतः-

१. मा. न्यायिक सदस्य व मा. सदस्य राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, औरंगाबाद/ नागपुर यांना माहितीस्तव.

२. मा. अध्यक्ष व सदस्य, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच.

३. ॲडव्होकेट बार असोसिएशन, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई /औरंगाबाद/ नागपुर

४. ॲडव्होकेट बार असोसिएशन, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच

५. प्रबंधक(विधी), राज्य आयोग परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद/ नागपुर.

६. प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांना निर्देशित करण्यात येते की, ॲडव्होकेट व पक्षकारांना संपर्कासाठी आवश्यक असणारे दुरध्वनी /मोबाईल क्रमांक कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्यात यावेत. तसेच सदरचे परिपत्रक देखील दर्शनी भागात लावावे.